Perfect INFRA ENGINEERS LTD.
(Formerly known as Perfect Aircon Engg. Ltd.) CIN NO.: L29190MH1996PLC099583
Website:www.perfectinfra.com • Email: nm@perfectinfra.com Tel.: 2760 6264
REGO. OFFICE: Plot No. R-637, T.T.C Industrial Area, Thane Belapur Road, MIDC Rabale, Navi Mumbai - 400 701.

CORPORATE OFFICE:
168, Bhanushali Chambers,
Sant Tukaram Road, Mumbai - 400 009.
Tel.: 2348 0129 / 2348 2226 / 27

ADMINISTRATIVE OFFICE:
C-303, Kailash Esplanade,
L.B.S. Marg, Ghatkopar (West),
Mumbai - 400 086.

Date: 10th August, 2020

To,
The Manager,
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, C-1, Block G,
Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai-400051

Symbol: **PERFECT**

Sub.: Submission of copies of newspaper advertisement for Postal Ballot Notice.

Dear Sir / Madam,

We wish to inform that the Company has issued a newspaper advertisement for Postal Ballot under applicable provisions of the Companies Act, 2013, read with relevant rules made thereunder, and other applicable laws & regulations, as amended and in terms of the circulars issued by the Ministry of Corporate Affairs, Government of India vide its General Circular No. 14/2020 dated April 08, 2020, General Circular No. 17/2020 dated April 13, 2020 and General Circular No. 22/2020 dated June 15, 2020 (the 'MCA Circulars').

Enclosing a copy of Newspaper Advertisement dated 09th August, 2020 & 10th August, 2020 published in 'Aapla Mahanagar' and 'Business Standard' respectively. The same has been made available on the Company's website www.perfectinfra.com.

Please take the above on record and acknowledge receipt of the same.

Thanking You, Yours faithfully,
For Perfect Infrangineers Limited

Praves h Palod
Digitally signed by Pravesh Palod
Date: 2020.08.10 13:57:49 +05'30'

Pravesh Palod
Company Secretary

Encl: Copy of Newspaper publication

राजस्थानमध्ये आता भाजपाच फुटीच्या मार्गावर

जयपूर● राजस्थानमध्ये गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या राजकीय नाट्यात दररोज नवनवी वळणे येत आहेत. दरम्यान, राजस्थानमधील गहलोत सरकार पाडण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या भाजपालाच आता फुटीची चिंता सतावत आहे. राज्याच्या विधानसभेच्या १४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या विशेष अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य तुटीपासून वाचण्यासाठी भाजपाने तयारी सुरू केली असून, खबरदारी म्हणून १२ आमदारांची गुजरातमध्ये पाठवणी करण्यात आली आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार हे १२ आमदार उदयपूर भागातील आहेत. मात्र, हे आमदार स्वत:च गुजरातमध्ये फिरण्यासाठी गेले आहेत, तसेच आज सोमनाथाचे दर्शन घेणार आहेत, असे सांगण्यात येत आहे. मात्र, सूत्रांच्या म्हणण्यानुसार भाजपानेच या आमदारांची गुजरातमध्ये पाठवणी केली आहे. दरम्यान, अजून काही आमदारांची मध्य प्रदेशमध्ये पाठवणी करण्यात येण्याची शक्यता आहे.

थोडक्यात

ॲड.मंगेश नेने यांची रायगड जिल्हा शांतता कमिटीच्या सदस्यपदी निवड

पेण●पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांची रायगड जिल्हा शांतता कमिटीच्या सदस्य पदी निवड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी नुकतीच केली. रायगड जिल्ह्यात जातीय सलोखा, कायदा सुव्यवस्था व शांतता राखणे तसेच महत्वाचे सण धार्मिक उत्सव आणि ज्यावेळी जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता असेल किंवा जातीय तणाव निर्माण झाला असेल अशा प्रत्येक वेळी शांतता समितीची बैठक आयोजित करणे. रायगड जिल्हा शांतता समितीच्या अशासकीय सदस्यपदी दोन वर्षांसाठी निवड करण्यात आल्याचे नियुक्ती पत्र जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी मंगेश नेने यांना दिले आहे.

तेरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीची आत्महत्या

मुंबई ● पवई येथे एका तेरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीने गळफास लावून आत्महत्या केली. परीक्षेत कमी गुण मिळाल्याने मानसिक तणावातून तिने आत्महत्या केल्याचे पोलीस निरीक्षक विजय दळवी यांनी सांगितले. याप्रकरणी तिच्या वडिलांची जबानी नोंदविण्यात आली असून त्यांनी कोणावरही संशय व्यक्त केला नाही. त्यामुळे पवई पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. यातील तक्रारदार पवईतील एका खाजगी कंपनीत कामाला आहे. त्यांना तेरा वर्षांची मुलगी असून ती तिच्या आजीसोबत विलेपार्ले येथे राहते. याच परिसरातील एका नामांकित शाळेत ती सध्या आठवीत शिकत होती. काही दिवसांपूर्वीच तिच्या वडिलांनी पवईतील म्हाडा कॉलनीत एक फ्लॅट विकत घेतला होता. शुक्रवारी ते त्यांच्या मुलीसोबत तिथे आले होते. सकाळी ते नेहमीप्रमाणे कामावर निघून गेले तर त्यांची मुलगी तिथेच अभ्यास करीत होती. दुपारी त्यांनी तिला फोन केला. मात्र, तिने काहीच प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे ते फ्लॅटवर आले, चावीने त्यांनी दरवाजा उघडला असता त्यांना त्यांच्या मुलीने पंख्याच्या हुकला गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिसून आले.

तरुणीवर सहकर्मचाऱ्याकडून बलात्कार

मुंबई ● सांताक्रुझ येथे एका २२ वर्षांच्या तरुणीवर तिच्याच सहकर्मचाऱ्याने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बलात्कारासह अन्य भादंवि कलमांतर्गत गुन्हा नोंद होताच विकास वर्मा या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. या वृत्ताला वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम कोरेगावकर यांनी दुजोरा दिला आहे. २२ वर्षांची ही पीडित तरुणी कुलाबा येथे राहते. कोरोनामुळे ती गेल्या दोन महिन्यांपासून तिच्या धारावी येथे राहणाऱ्या मावशीकडे राहण्यासाठी आली होती. ती सध्या सांताक्रुझ येथील कपडे विक्रीच्या दुकानात कामाला आहे. ५ ऑगस्टला दुकानाचा मॅनेजर नूर यांनी तिला दुकानात विकास शर्मा हा कर्मचारी एकटाच असल्याने त्याला मदत करण्यास सांगितले होते. यावेळी विकासने तिच्याशी लगट करुन तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला.

कोकणवासीयांना बाप्पा पावला
मनसेने शब्द पाळला

खास प्रतिनिधी● मुंबई

गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी दादरमधून मनसेकडून खासगी गाड्या सोडण्यात आल्या. मुंबईत विविध भागांमधून जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी जवळपास २५० बसेसची व्यवस्था मनसेकडून करण्यात आली आहे. यादरम्यान मनसेकडून कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रवाशांना प्रोटेक्शन कीट दिली जात आहे. शनिवारी दादरमधून मनसे बस सेवेला प्रारंभ झाला आणि पहिली बस कोकणकडे रवाना झाली. हा उपक्रम मनसे आणि महापालिका कामगार सेनेच्या वतीने राबवण्यात आला आहे.

'गेल्या काही दिवसांपासून गणेशोत्सवानिमित्ताने कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांमध्ये संभ्रमावस्था आणि नाराजी होती. कारण सरकारकडून त्यांना कोणतेही ठोस उत्तर दिलं जात नव्हतं. एसटी बसेस जाणार आहेत की नाही? किती दिवस अगोदर जाणार आहेत?

गणेशोत्सवानिमित्ताने मनसेची विशेष बस सेवा सुरू



किती दिवस क्वारंटाईन केले जाणार आहे?. जेव्हा सरकारकडून लोकांना योग्य उत्तर मिळत नव्हतं त्यावेळेला मनसे नेहमीप्रमाणे पुढे धावून आली. त्यामुळे विविध भागांमधून कोकणवासीयांसाठी मनसेकडून बसेस सोडल्या जात आहेत', असं मनसे नेते माजी आमदार नितीन सरदेसाई मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले.

'शनिवारी जवळपास १० ते १५ बसेस दादरमधून सोडल्या आहेत. उर्वरित बसेस ठाणे, बोरिवली, भांडूप अशा विविध भागातून सोडण्यात येणार आहेत. २०० ते २५० बसेस महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून कोकणवासीयांसाठी सोडण्यात येणार आहेत. बसमध्ये बसण्याची क्षमता ४८ ते ५० लोकांची असली तरी आम्ही २४ लोकांना एकाच बसमधून सोडले जात आहे', अशी माहिती संदीप देशपांडे यांनी दिली. या बसेस चिपळून, महाडपासून कणकवली-सावंतवाडीपर्यंत जाणार आहेत.

नालेसफाईच्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाका

मुंबई ●मागील दोन दिवसांत कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे शहर आणि उपनगरातील अनेक भागात पाणी साचल्याने मुंबईतील नालेसफाई झाली नसल्याचा आरोप खरा ठरला आहे. यापूर्वी आपण नालेसफाई झाली नसल्याचे पुरावे तळातील गाळ दाखवत दिले होते. ते आरोप या पावसात खरे ठरले असून आता तरी प्रशासनाने नालेसफाई झाली नसल्याचे मान्य करून या सफाई कामाची चौकशी करावी, अशी मागणी महापलिका विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केली आहे. तसेच त्यांना काळया यादीत टाकून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, असेही त्यांनी आपल्या निवेदनाद्वारे आयुक्तांकडे केली आहे.

मागील चार दिवसांपूर्वी कोसळलेल्या मुसळधार पावसात मुंबईतील सातही परिमंडळांच्या क्षेत्रात अनेक भागांत पाणी साचले होते. त्यामुळे संपूर्ण मुबई जलमय झाली. पण तुंबलेले पाणी ज्या वेगाने जमा झाले, त्यानंतर त्याचा निचरा योग्य प्रकारे झाले नाही. परिणामी मुंबईकरांचे मोठे हाल झाले. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात जीवित व वित्तहानी झाली झाली. या वर्षी नालेसफाईवर ९० कोटी रुपये खर्च करूनही अनेक भागात पाणी तुंबले.

महापालिकेने कोट्यवधी रुपयांची कंत्राटे देऊनही कंत्राटदारांनी नाल्यातील

पालिका विरोधी पक्षनेते रवी राजा यांची मागणी

गाळ न काढता त्यातील केवळ तरंगता कचराच साफ केला आहे.तसेच जो कचरा नाल्यातून बाहेर काढला तो नाल्याच्या बाजूलाच ठेवला आहे. तो कचरा पुन्हा नाल्यात गेला आहे. त्यामुळे नालेसफाईच्या कामावर खर्च केलेला निधी वाया गेल्याचा आरोप महापालिका विरोधी पक्षनेते रवी राजा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले. त्यामुळे महापलिका करदात्यांना आवश्यक सुविधा देऊ शकलो नाही ही गंभीर बाब असून सातही परिमंडळांच्या कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राजा यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खरीप कर्जासाठी सोमवारपासून आंदोलन

प्रतिनिधी● मुंबई

खरीप हंगाम अर्ध्यावर आला असताना सुद्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व राष्ट्रीय बँका शेतकऱ्यांना कर्ज देण्याकरीता दिरंगाई करत असून अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून शेतकऱ्यांना नाहक त्रास देत असल्याचा आरोप भारतीय जनता पार्टीचे किसान मोर्चाचे अध्यक्ष व माजी कृषीमंत्री डॉ. अनिल बोंडे यांनी केला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे कर्ज मिळावे यासाठी सोमवार १० ऑगस्टपासून भाजपा कार्यकर्ता प्रत्येक बँकेत जावून शेतकऱ्यांना कर्ज वितरणाचा लाभ घेण्यासाठी सहाय्यक म्हणून मदत करणार आहे तसेच कर्ज माफीनंतरचे व्याज बँकांनी हडपू नये म्हणून ठिय्या आंदोलन करणार असल्याचे डॉ. अनिल बोंडे यांनी म्हटले आहे.

राज्य सरकारने कर्जमाफी घोषित केली मात्र त्याची अंमलबजावणी करण्यात दुर्लक्ष केले आहे त्यामुळे शेतकऱ्यांना खरीपाचे कर्ज मिळू शकलेले नाही. कर्जमाफी झालेल्यांना व जुने कर्ज असलेल्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे पीक कर्जाकरिता फक्त सातबारा, आठ 'अ' व आधार कार्ड एवढ्याच गोष्टीची आवश्यकता आहे. मात्र, यंदा कर्जमाफी याद्यांची तपासणी करून सुद्धा बँका शेतकऱ्यांना व्याजाचे पैसे भरायला सांगणे, शेतनकाशा, फेरफार, ना हरकत प्रमाणपत्र अशा अनावश्यक कागतपत्रांची मागणी करत आहे. या सगळ्या कागदपत्रांची जमवाजमव करताना वेळ निघून जात आहे.

अमरावती विभागामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून २२०१ कोटी रुपयाचे कर्ज वाटप अपेक्षित होते. मात्र १३५१ कोटीचे कर्ज वाटप झाले आहे. अमरावती जिल्हा सहकारी बँकेने फक्त ३३% रकमेचे वाटप केले आहे. अमरावती विभागामध्ये राष्ट्रीयकृत बंकेनी ५९७४ कोटी रुपयाचे वाटपाचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी फक्त १८३४ कोटी रुपयांचे वाटप केले आहे. अमरावती विभागामध्ये फक्त ३०% कर्ज वाटप राष्ट्रीयकृत बँकेनी केले आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये फक्त २३% कर्जवाटप राष्ट्रीयकृत बँकेनी केले आहे. शेतकऱ्यांना सुलभरीत्या कर्ज मिळावे यासाठी भाजपा कार्यकर्ते पुढाकार घेऊन सोमवार पासून प्रत्येक जिल्हा आणि राष्ट्रीयकृत बँकेत शांततेच्या मार्गाने ठिय्या आंदोलन करताना शेतकऱ्यांना कर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहाय्यक म्हणून मदत करणार, असे डॉ. बोंडे म्हणाले.

भाजपच्या आंदोलनानंतर आयुक्तांसह मुख्यालयाला बाऊन्सरचे कवच

खास प्रतिनिधी● मुंबई

चित्रपट अभिनेता सुशांत सिंह यांच्या आत्महत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या पाटण्याचे वरिष्ठ आय.पी.एस. अधिकारी विनय तिवारी यांना क्वारंटाईन केल्यामुळे भाजपच्या नगरसेवकांनी महापालिका मुख्यालयात तीव्र निदर्शने केली. महापालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांच्या दालनाबाहेर भाजपच्या नगरसेवकांनी केलेल्या हल्लाबोल आणि दरवाज्याला पोस्टर लावण्याचा केलेला प्रयत्न, या पार्श्वभूमीवर महापलिका आयुक्तांसह मुख्यालयाच्या सुरक्षेसाठी खासगी सुरक्षा कंपनीचे बाऊन्सर तैनात करण्यात आले आहेत.

महापालिका मुख्यालयात ३ ऑगस्टला भाजपचे महापलिका गटनेते प्रभाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या नगरसेवकांनी आयुक्तांच्या दालनाबाहेर घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन केले. यावेळी महापलिका सुरक्षा रक्षकानी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यानंतरही त्यांनी आयुक्तांविरोधात घोषणाबाजी करत निषेधाचे पोस्टर आयुक्तांच्या दालनाबाहेर चिकटवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महापालिका आयुक्तांनी सुरक्षा व्यवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर सुरक्षा विभागाचे उपायुक्त प्रभात रहांगदळे यांनी खासगी सुरक्षा कंपनीचे बाऊन्सर तैनात केले आहे. आयुक्तांच्या दालनाबाहेर चार तर प्रवेश क्रमांक २ वर दोन अश्याप्रकारे मुख्यालयात आणि आयुक्तांच्या दालनाबाहेर खासगी सुरक्षा कंपनीच्या तगड्या जवानांना(बाऊन्सर) तैनात करण्यात आले आहे.

महापालिका आयुक्तांनी वरिष्ठ आय.पी.एस. अधिकारी विनय तिवारी यांना ताबडतोब विलगीकरणापासून सूट द्यावी अशी आग्रहाची मागणी भारतीय जनता पार्टी, मुंबईच्या वतीने करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांनी आमच्या या कायदेशीर मागणीकडे ' दुर्लक्ष केल्यास भारतीय जनता पार्टी, मुंबई मार्फत एक मोठे आंदोलन छेडावे लागेल असा इशारा भाजपच्या नगरसेवकांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवरच आयुक्तांनी ही सुरक्षा वाढवली असल्याचे बोलले जात आहे. महापालिका मुख्यालायात आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या दालनाबाहेर मजबूत शरीरयष्टी असलेल्या सुरक्षा रक्षकांना तैनात करण्याचा निर्णय यापूर्वी उपायुक्त प्रभात रहांगदळे यांनी घेतला होता.

गणपतीच्या मुकुटावर अजगराचा मुक्काम!



वार्ताहर●खालापूर

कोरोनामुळे माणसे घराबाहेर पडण्यास मर्यादा आल्या असल्या तरी प्राण्यांचा मुक्त संचार सुरू असून एका अजगराने चक्क गणेश कला केंद्रात मूर्तीच्या मुकुटावरच काही वेळ मुक्काम ठोकला!

तालुक्यातील देवन्हावे हद्दीत सतीश लखिमळे यांनी शनिवारी नेहमीच्या सवयीप्रमाणे शटर उघडले असता त्यांना एका गणेशाच्या मूर्तीवर झाकलेल्या प्लास्टिकच्या वेष्टनाखाली काहीतरी हालचाल जाणवली. त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता अजगर जातीचा साप मूर्तीवरील मुकुटाच्या जागी वेटोळे घालून बसला होता.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तालुक्यातील सर्पमित्रांच्या चमूमधील चेतन चौधरी यांना ही माहिती दिली. चौधरी यांनी संदेश चौधरी यांच्या सहाय्याने ४ फूट लांबीच्या त्या अजगराला मूर्तीवरून सावधतेने बाजूला करून ताब्यात घेतले. त्यानंतर त्याला सुरक्षित वन क्षेत्रात सोडून देण्यात आले.

वाहतूक उद्योगक्षेत्राला कर्जफेडीकरिता आणखी ४ महिन्यांची मुदतवाढ द्या

मुंबई ●कोरोना महामारीने देशभरातील सर्वच उद्योगक्षेत्रांना मोठा आर्थिक फटका बसला असून मार्चअखेर सरकारने टाळेबंदीचे कडक आदेश दिल्याने जवळपास सर्वच उद्योग व्यवसाय हे आजतागायत पूर्णत ठप्प आहेत. या पार्श्वभूमीवर आर्थिक संकटात सापडलेल्या उद्योगक्षेत्रांना काहीअंशी दिलासा देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने कर्जफेडीसाठी अतिरिक्त ४ महिन्यांची (डिसेंबर २०२० पर्यंत) मुदतवाढ देण्याची शिफारस केंद्राकडे करावी अशी मागणी शिव वाहतूक सेनेने राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

शिव वाहतूक सेनेची मागणी

यापूर्वी केंद्र सरकारने मार्च ते ऑगस्ट अशी ६ महिन्यांसाठीची कर्जफेड मुदतवाढ जाहीर केली होती. मात्र अद्याप कोरोनावरील खात्रीशीर लस बाजारात उपलब्ध झाली नसल्याने तसेच परिस्थिती नियंत्रणात नसल्याने बहुतांश उद्योगधंदे अजूनही ठप्पच आहेत. सरकारी कार्यालये, खासगी आस्थापने, तारांकित हॉटेल्स अत्यंत कमी प्रमाणात सुरू झाल्याने ॲटोरिक्षा, टॅक्सी, खासगी टुरिस्ट वाहने आणि बसेस (अत्यावश्यक सेवा वगळता) यांनाही कुठलाच व्यवसाय गेले ६ महिन्यात मिळालेला नाही. परिणामी कोणतीही आर्थिक आवक नसल्याने अनेक व्यवसाय, आस्थापने आणि उद्योगक्षेत्रांत कामगार कमी करण्याची नामुष्की ओढावली असून काही उद्योगक्षेत्रातील व्यवसाय हे कायमस्वरूपी बंद होण्याच्या मार्गावर आहेत.

नुकतेच आरबीआयने आपल्या पतधोरण आढावा बैठकीनंतर यापुढील काळात कर्जफेडीसाठी कोणतीही मुदतवाढ देता येणार नसून संबंधित कर्जाची पुनर्रचना करण्यासंबंधी निर्देश देण्यात येतील असे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे कर्जफेडीसाठी कर्जधारकांना वाढीव कालावधी आणि आधीच्या तुलनेत कमी कर्जहप्ता रक्कम (ईएमआय) भरावी लागणार आहे.

भरमसाठ रकमेची वीज बिले हा महावितरणचा घोटाळा -किरीट सोमय्या

मुंबई ●महावितरणने राज्य सरकारच्या मान्यतेने भरमसाठ रकमेची बिले पाठवून सामान्य माणसाच्या पैशावर डल्ला मारला आहे. महावितरणची आर्थिक गरज भागविण्यासाठी केलेला हा घोटाळाच आहे, असा आरोप भाजपा नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. भाजपा प्रदेश कार्यालयात आय्रोजीत पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

कोरोना काळात सरासरी वीजबिल देण्याचा निर्णय राज्य सरकारने घोषित केलेला मात्र प्रत्यक्षात फक्त एप्रिल, मे आणि जून मध्ये सरासरी बिले दिली. जूलै महिन्याचं प्रत्यक्ष रिडींगनुसार बिल देणार असं सांगून तब्बल दुप्पट-तिप्पट किमतीची वाढीव बिलं वाटली गेली. महावितरणला त्यांच्या कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी आणि विद्युत पुरवठा सुरू ठेवण्यासाठी २० हजार कोटी रूपयाची आवश्यकता होती. राज्य सरकारने हतबलता दर्शवल्यामुळे मंत्रालय्रामध्ये बसुन सामान्यांची अशा वाढीव बिलांच्या रूपाने लूट करण्याचा निर्णय खुद्द राज्य सरकारनेच घेतला. जवळपास १ लाखाहून अधिक ग्राहकांना ५ हजार युनिटपर्यंत वाढीव रिंडींग दाखवुन वाढीव वीज बिल दिल्याचे उघडकीस आले आहे. अनेकांना वाढीव बिल दिल्याचे आणि त्यात सुधारणा केल्याचे महावितरणने मान्य केले असेही सोमय्या यांनी नमुद केले.

राज्य सरकारने जुलै महिन्यात करण्यात आलेल्या रिडींगला स्थगिती द्यावी, जुलै महिन्याची बिलं मागे घ्यावीत, कोरोना काळात केलेली २० ते २२ टक्के दरवाढ रद्द करावी व वीज बिल भरण्यासाठी मुदतवाढ द्या, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, मुंबई, महामुंबई अशा राज्याच्या सर्व भागातून वाढीव वीजबिलांचे १०० नमुने गोळा केलेले 'महावितरणचा काला चिठ्ठा' उर्जामंत्र्यांना पाठवणार असून राज्यपालांची भेट घेऊन त्यांच्यापुढे ही समस्या मांडणार असल्याची माहिती सोमय्या यावेळी दिली.

भिवंडीत ॲन्टीजेन तपासणी सुरू
१४ जण कोरोनाबाधित आढळले

भिवंडी ● भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख दाटीवाटी गर्दीच्या चौकात बाजारपेठ एरियात भाजी मार्केट परिसरात फिरत्या तपासणी पथकाद्वारे ॲन्टीजेन तपासणी सुरू करण्यात आली आहेत. ॲम्ब्युलन्स किंवा मोबाईल व्हॅन यामध्ये वैद्यकीय पथक कार्यरत असून प्रभाग समिती निहाय गर्दीच्या परिसरात सदर तपासणी करण्यात येत आहे. शुक्रवारपासून या शहरात ॲन्टीजेन तपासणी करण्यास सुरुवात झालेली आहे.

यापूर्वी स्व. इंदिरा गांधी हॉस्पिटल, रईस हायस्कूल कोविड केंद्र, वराळ देवी मंगल कार्यालय कोरोना केंद्र, टाटा आमंत्र, याठिकाणी ॲन्टीजेन टेस्ट करण्यात येत होत्या. पण नागरिकांचा फारसा त्या ठिकाणी येऊन तपासणी करण्यास प्रतिसाद मिळत नाही हे लक्षात घेऊन, प्रत्यक्ष बाजारपेठेत, भाजी मार्केट परिसर, दाट नागरी वस्तीमध्ये या कोरोना ॲन्टीजेन टेस्ट करण्यात येत आहेत. शुक्रवारी सकाळपासून ओसवाल वाडी, नवीवस्ती, शांती नगर भाजी मार्केट याच बरोबर प्रभाग समिती ३, प्रभाग समिती ४, प्रभाग समिती क्र.५ ऑफिस कार्यालय याठिकाणी कामगार कर्मचारी यांची देखील ॲन्टीजेन तपासणी करण्यात आल्या.

शुक्रवारी केलेल्या मोहिमेत एकूण २६१ नागरिकांची ॲन्टीजेन तपासण्या करण्यात आल्या यामध्ये १४ नागरिक कोरोना बाधित आढळली असून, उर्वरित २४७ लोकांना कोरोनाची लक्षणे दिसून आली नाहीत. प्रत्येक नागरिकांनी स्वतःहून पुढे येऊन आणि आपण तपासणी करून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून भिवंडी शहर कोरोना मुक्त होण्यास मदत होणार आहे.

मध्य रेल्वे

सप्टे २०२० च्या महिन्यासाठी ई-लिलाव कार्यक्रम

भांडार नियंत्रक हे भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने खाली नमूद करण्यात आलेल्या भंगाराच्या विक्रीसाठी सप्टे २०२० च्या महिन्यादरम्यान ई-लिलावाचे आयोजन करणार आहेत. **टिप:** ह्यानंतर वृत्तपत्रामध्ये ई-लिलाव कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येणार नाही आणि मध्य रेल्वे आयआरईपीएस संकेतस्थळ पत्ता www.ireps.gov.in वरील लिंक चा संदर्भ घेऊ शकतात.

लिलाव करणारे अधिकारी	लिलाव दिनांक आणि वार	
वरी. डीएमएम/ एनजीपी	०२.०९.२०२० बुधवार	२२.०९.२०२० मंगळवार
वरी. डीएमएम/ बीएसएल	०३.०९.२०२० गुरुवार	२३.०९.२०२० बुधवार
वरी. डीएमएम/ पीए	०४.०९.२०२० शुक्रवार	२१.०९.२०२० सोमवार
वरी. डीएमएम/ एमबी	१०.०९.२०२० गुरुवार	२५.०९.२०२० शुक्रवार
वरी. डीएमएम/ एसयूआर	११.०९.२०२० शुक्रवार	२४.०९.२०२० गुरुवार
एसएमएम (जी) सीआरडी	०३.०९.२०२० गुरुवार	१७.०९.२०२० गुरुवार
उप सीएमएम (एम) पीआर	१०.०९.२०२० गुरुवार	२३.०९.२०२० बुधवार
उप सीएमएम (सीडब्ल्यूई) एमटीएन	०४.०९.२०२० शुक्रवार	२२.०९.२०२० मंगळवार
एचबीएचआर करीता उप सीएमएम (एस) एचक्यू	०३.०९.२०२० गुरुवार	१७.०९.२०२० गुरुवार
एमएमआर करीता वरी. सीएमएम (एस) एचक्यू	०३.०९.२०२० गुरुवार	१७.०९.२०२० गुरुवार
उप सीएमएम (एसीएल) बीएसएल	११.०९.२०२० शुक्रवार	२५.०९.२०२० शुक्रवार

टिप: जर गरज वाटल्यास योग्य लॉटससाठी मूळ दिनांक आणि वेळेपासून दुसऱ्या कामकाजाच्या दिवशी पुरवणी लिलावाचे आयोजन करण्यात येईल. रेल्वे प्रशासन स्वत:च्या अख्त्यारीमध्ये कोणताही पुरवणी लिलाव रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

टिप: ए) कोणत्याही लीलावामधून कोणताही लॉट वगळण्याचे अधिकार रेल्वे राखून ठेवत आहेत. **बी)** कोणत्याही डेपो/विभागाचा कोणताही लॉटचा त्यानंतर कोठेही लिलाव करण्याचे तसेच कोणत्याही स्वरूपामध्ये लिलाव करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत. **सी)** कोणत्याही डेपोचा लिलाव न झालेला लॉटचा लिलाव मध्य रेल्वेच्या अन्य कोणत्याही डेपो मध्ये त्यानंतर लिलाव करण्यात येईल. **डी)** वाया गेलेले/सांडलेले तेल, ग्रीस, टीएल बॅटरीज, मोना मेटल स्क्रॅप ब्रास, ब्रास ड्रोस, कॉपर स्क्रॅप, आयएसआरआय कोड मटेरीयल सह डुईड झिंक स्क्रॅप सह पीव्हीसी शिटिंगसोबत कॉपर ड्रोस इंस्युलेटेड कॉपर वायर स्क्रॅप/ कॉपर, लीड स्क्रॅप, मिक्स्ड नॉन फेरस मेटल स्क्रॅप किंवा एखाद्या लॉटसाठी विशेष उल्लेख नसल्यास केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून जारी करण्यात आलेल्या वैध परवाना धारक पुनर्प्रकीया कारांना त्याची विक्री करण्यात येईल. अधिक माहितीसाठी कृपया संबंधित डेपो अधिकाऱ्याशी संपर्क साधा. **ई)** ई-लिलाव संकेतस्थळ: www.ireps.gov.in

क्र. एस. १२० टी. लिलाव कार्य./२०२०-२१/ दिनांक: ०७.०८.२०२०

रेल्वेच्या चौकशीसाठी १३९ डायल करा 267

परफेक्ट इन्फ्राइंजिनियर्स लिमिटेड

(पूर्वी परफेक्ट एअरकॉन इंजि. लि. म्हणून ज्ञात)

सीआयएन: एल२९१९०एमएच१९९६पीएलसी०९९५८३

नोंदणी. कार्यालय: प्लॉट क्र. आर-६३७, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे बेलापूर रोड, एमआयडीसी रबाले, नवी मुंबई - ४०० ७०१. **संकेत:** www.perfectinfra.com **ई-मेल:** nm@perfectinfra.com

टपाली मतदान सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमावली, २०१४ सह वाचल्या जाणाऱ्या कंपनी कायदा, २०१३ (ऋकायदाऋ) च्या कलम ११० आणि जर असल्यास अन्य लागू असलेल्या तरतुदींच्या सह सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ (कोणत्याही संवैधानानिक फेरफार (रां) सह किंवा सध्या अंमलात आण्यात आलेल्या पुनर्प्रक्रिया सह) आणि कंपनी व्यवहार मंत्रालयाच्या द्वारे जारी करण्यात आलेल्या सामान्य परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित एप्रिल ०८, २०२० सामान्य परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांकित एप्रिल १३, २०२० आणि सामान्य परिपत्रक क्र. २२/२०२० दिनांकित जून १५, २०२० च्या अनुषंगाने परफेक्ट इंफ्राइंजिनियर्स लिमिटेड (कंपनी) ने टपाली मतदान सूचना (सूचना) दिनांकित ८ ऑगस्ट २०२० त्यांच्या सर्व सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट द्वारे डिपॉझिटरीज आणि कंपनीच्या रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट, केएफआयएन टेक्नोलॉजीस प्रा. लि. (केफिनटेक) ह्यांच्याकडे नोंदविण्यात आले आहेत त्यांना ई-मेलद्वारे सूचना दिनांकित ७ ऑगस्ट २०२० मध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यवसायावर विचार करण्यासाठी पाठविण्यात आल्या आहेत.

प्रत्येक सभासदाचा मतदानाचा अधिकार त्याने कट ऑफ दिनांक म्हणजेच २४ जुलै २०२० अनुसार कंपनीच्या एकूण भरणा करण्यात आलेल्या समभाग भांडवलामध्ये त्याने/तिने केलेल्या समभाग भांडवलाच्या प्रमाणामध्ये निश्चित करण्यात येईल जे केवळ मात्दानासाठी विचारात घेण्यात येईल. अशा व्यक्तींसाठी जे कट ऑफ दिनांकाच्या अनुसार सभासद नाहीत त्यांनी सदर सूचना ही केवळ माहितीसाठीच असल्याचे समजावे.

कंपनीने त्यांच्या सभासदांसाठी ऋदूरस्थ ई-मतदानऋ सुविधा पुरविण्यासाठी केफिनटेकच्या सेवांची नियुक्त करण्यात आली आहे. दूरस्थ ई-मतदानाची सुरवात रविवार, ०९ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ०९:०० वा भारतीय प्रमाणवेळ (ऋआयएसटीऋ) होईल आणि सोमवार, ०७ सप्टेंबर २०२० रोजी सायं. ०५:०० वा. (ऋआयएसटीऋ) पर्यंत दोन्ही दिवस धरून चालू असेल. दूरस्थ ई-मतदान प्रणाली सोमवार, ०७ सप्टेंबर २०२० रोजी संध्याकाळी ०५:०० वा. नंतर केफिनटेकद्वारे अकार्यक्षम करण्यात येईल.

संचालक मंडळाने निलेश ए. प्रधान अँड कं., एलएलपी, कार्यरत असलेले कंपनी सचिव ह्यांचे भागीदार श्रीमती प्राजक्ता व्ही. पाध्ये (एफसीएस क्र. ७४७८) ह्यांची ई-मतदान प्रक्रिया आणि टपाली मतदान प्रक्रियेच्या छाननीसाठी न्यायपूर्ण आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी छाननीकर्ते म्हणून नियुक्ती केली आहे. श्रीमती प्राजक्ता व्ही. पाध्ये ह्यांच्याद्वारे ऋदूरस्थ ई-मतदानऋची छाननी करण्यात कोणतेही अपयश आल्यास कार्यरत असेलेले कंपनी सचिव श्री निलेश ए. प्रधान हे त्यांच्या ऐवजी छाननीकर्ते म्हणून काम पाहतील.

कंपनीच्या सभासदांना ह्याद्वारे असेही कळविण्यात आणि विनंती करण्यात येत आहे की खालील बाबींची नोंद घ्यावी:

१. दूरस्थ ई-मतदानासाठी आवश्यक सूचना सूचना दिनांकित ०७ ऑगस्ट २०२० मध्ये देण्यात आल्या आहेत.
२. सभासदाच्य द्वारे एकदा ठरवावर मतदान केल्या नंतर त्याला/ तिला त्यानंतर त्यांचे मत बदलता येणार नाही किंवा पुन्हा मतदान करता येणार नाही.
३. सभासदानाच्या मतदानाचा अधिकार कट ऑफ दिनांकाला कंपनीच्या समभाग भांडवलामध्ये त्यांनी धारणा केलेल्या समभागांच्या तुलनेमध्ये निश्चित करण्यात येईल.
४. टपाली मतदानाची सूचना स्पष्टीकरण निवेदनाच्या सह दूरस्थ ई-मतदान सूचना आणि एमसीए परिपत्रकाच्या अनुसार दूरस्थ ई-मतदान सूचना आणि टपाली मतदान प्रक्रिया प्राप्त करण्यासाठी नोंदणीकृत नसलेल्या सभासदांसाठी ई-मेल नोंदविण्याची प्रक्रिया कंपनीच्या www.perfetinfra.com ह्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. स्पष्टीकरण निवेदनासोबत टपाली मतदान सूचना केफिनटेक च्या ई-मतदान (i) संकेतस्थळ https://evoting.karvy.com वर उपलब्ध आहे आणि कंपनीचे समभाग सूचीबद्ध असलेल्या नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
५. एमसीए परिपत्रकाच्या अनुषंगाने सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद केलेली नाही आणि त्यामुळे ई-मतदान सूचना प्राप्त होऊ शकलेली नाही त्यांना त्यांच्या ई-मेल आयडीची तात्पुरती नोंद केफिनटेक च्या लिंक वर https://karishma.kfintech.com/emailreg वर नोंदविता येईल आणि त्यानंतर खालील नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून नोंदणी करता येईल. ई-मेल आयडीची नोंदणी यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर कंपनीच्या सभासदांना सदर टपाली मतदान सूचनेची प्रत आणि युजर आयडी आणि पासवर्ड सह ई-मतदान प्रक्रिया सदर टपाली मतदान प्रक्रियेची प्रत प्राप्त करता येईल. जर कोणतीही समस्या असल्यास einward.ris@kfintech.com वर मेल करता येईल.
६. हे स्पष्ट करण्यात येत आहे की ई-मेल आयडीच्या नोंदणीसाठी, सभासदांना विनंती करणायत येत आहे की त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद जर त्यांनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात केली असल्यास संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट द्वारे डिपॉझिटरीज आणि जर प्रत्यक्ष स्वरूपात असल्यास कंपनीच्या आरटीए केफिन टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, फायनॅन्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रगुदा, सेरीनम्पल्ली मंडळ, हैदराबाद, ५०००३२ भारत ह्यांच्याकडे योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून करता येईल.
७. एमसीए परीपात्राकांच्या अनुषगाने दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे मतदान करता येईल. दूरस्थ ई-मतदान करण्यासाठी सभासदाने सभेला प्रत्यक्ष पणे हजर राहण्याची गरज नसून सभासदांना विनंती करण्यात येत आहे की त्यानी स्वत: दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेचा वापर करून मतदान करावे आणि त्यासाठी अन्य व्यक्ती/ प्रतिनिधीची नियुक्ती करू नये. तथापि, टपाली मतदान पत्रिका आणि प्री-पेड बिजनेस लिफाफा हयासह टपाली मतदान सूचनेची प्रत्यक्ष प्रत टपाली मतदान प्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार नाही आणि सभासदांनी दूरस्थ ई-मतदान यंत्रणेच्या द्वारे केवळ मान्य किंवा अमान्य असे नमूद करावे लागेल.
८. ई-मतदानाच्या संदर्भात जर कोणतीही समस्या किंवा तक्रार असल्यास https://evoting.karvy.com वर असलेल्या help किंवा एफएक्यू ला भेट द्या किंवा श्री. वासंथ राव चौधरी, व्यवस्थापक, केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, फायनॅन्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रगुदा, सेरीनम्पल्ली मंडळ, हैदराबाद, तेलंगाना - ५०००३२, भारत ह्यांच्याशी ई-मेल: einward.ris@kfintech.com , संपर्क क्र.: +९१ ४० ६७१६१५००, + ९१ ४० ३३२१०००० आणि टोल फ्रि क्र.१८०० ३४५ ४००१वर संपर्क करता येईल.
९. टपाली मतदानाचा बुधवार, ०९ सप्टेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी म्हणजेच दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर ४८ तासांपेक्षा उशिरा नाही म्हणजेच बुधवार, ०९ सप्टेंबर २०२० रोजी किंवा त्यापूर्वी करण्यात येईल. टपाली मतदानाचा निष्कर्ष कंपनीच्या www.perfectinfra.com आणि केफिन च्या ई-मतदान संकेतस्थळ https://evoting.karvy.com वर देखील प्रसिद्ध करण्यात येईल आणि कंपनीचे समभाग जिथे सूचीबद्ध आहेत त्या नॅशनल स्टॉक एक्स्चेंजला कळविण्यात येईल.

परफेक्ट इंफ्राइंजिनियर्स लिमिटेडच्या
संचालक मंडळाच्या वतीने
सही/-
प्रवेश पालोद
कंपनी सचिव

दिनांक: ०८ ऑगस्ट २०२०
ठिकाण: मुंबई

UCO BANK

Andheri West Branch, Building No. 4, Yashodhan Apartment, 4 Bunglows, Andheri West, Mumbai - 400 058 Phone : 022-26356744 Email : andher@ucobank.co.in

POSSESSION NOTICE

[Under Rule 8(1) of Security Interest (Enforcement) Rules, 2002]

Whereas

The undersigned being the authorized officer of the **UCO Bank, Andheri West Branch, Building No. 4, Yashodhan Apartment, 4 Bunglows, Andheri West, Mumbai - 400 058** under the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (Act No. 54 of 2002) and in exercise of powers conferred under section 13(12) read with rule 3 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 issued a Demand Notice Dated **03/01/2020** Calling upon the Borrowers **Mr. Pankaj R Tripathi & Mrs. Seema P Tripathi** to repay the amount mentioned in the notice being **Rs. 50,89,865.00/- (Rupees Fifty Lakh Eighty Nine Thousand Eight Hundred Sixty Five Only) as on 30/11/2019** within 60 days from the date of receipt of the said notice with future interest and incidental charges w.e.f. **01/12/2019.**

The borrower having failed to repay the amount, notice is hereby given to the borrower / Guarantor and the public in general that the undersigned has taken **Possession** of the property described herein below in exercise of powers conferred on him/her under section 13(4) of the said Act read with rule 8 of the Security Interest (Enforcement) Rules, 2002 on this **06th Day of August of the year 2020.**

The borrower/guarantor in particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of the **UCO Bank, Andheri West Branch, Building No. 4, Yashodhan Apartment, 4 Bunglows, Andheri West, Mumbai - 400 058** for an amount of **Rs. 50,89,865.00/- (Rupees Fifty Lakh Eighty Nine Thousand Eight Hundred Sixty Five Only) as on 30/11/2019** plus interest and incidental expenses incurred by bank w.e.f. **01/12/2019.**

The borrower's attention is invited to provisions of sub-section (8) of section 13 of the Act, in respect of time available, to redeem the secured assets.

DESCRIPTION OF THE IMMOVABLE PROPERTY

Residential Flat No. B-4/502, measuring 855 Sq.Ft. Built up, 5th Floor, Mangal Orchid CHS Ltd. Yari Road, Versova, Andheri (West), Mumbai-400061.

Bounded:-

On the North by : Mangal Orchid B/3 building On the South by : Mangal Orchid B/5 building
On the East by : Mangal Orchid A building On the West by : Open Place

PLACE : Mumbai **Authorised Officer**
DATE : 06/08/2020 **UCO Bank**

IEX INDIAN ENERGY EXCHANGE

Power on Demand
Most Competitive Prices
Flexible Customised Buy

Electricity Market: Price & Volume - July, 2020

DAY-AHEAD MARKET (DAM)

Total Volume (MU)	4,487	Average Daily Volume (MU)	145

Area Prices (Rs./kWh)

Area	Average	Min.	Max.
All India	2.47	0.88	5.17

TERM-AHEAD MARKET (TAM)

Contracts	Weekly	Intraday	Day-ahead Contingency	Daily
Total Volume (MU)	-	6.06	17.75	38.64
Max. Price (Rs./kWh)	-	4.40	3.85	3.85
Min. Price (Rs./kWh)	-	2.57	2.12	3.85
Total Volume (MU)	62.45			

REAL-TIME MARKET (RTM)

Total Volume (MU)	785	Average Daily Volume (MU)	25

Area Prices (Rs./kWh)

Area	Average	Min.	Max.
All India	2.49	0.19	5.65

REC Market

The REC Trading Session scheduled on Wednesday, 29 July 2020 could not take place pursuant to the stay order dated 20 July 2020 as issued by Honourable Appellate Tribunal of Electricity (APTEL)

1 MU = 1 Million kWh

For any further information, please contact:
Indian Energy Exchange Limited (CIN: L74999DL2007PLC277039)
Tel: +91-11-4300 4022/33 | Email: contact@iexindia.com | www.iexindia.com

---

Perfect Infraengineers Limited

(Formerly known as Perfect Aircon Engg. Ltd.)
CIN : L29190MH1996PLC099583
Regd. Office : Plot No. R-637, T.T.C. Industrial Area, Thane Belapur Road, MIDC Rabale, Navi Mumbai - 400 701. **Web :** www.perfectinfra.com • **Email :** nm@perfectinfra.com

POSTAL BALLOT NOTICE

NOTICE is hereby given pursuant to the provisions of Section 110 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013, (the 'Act') read with read with Companies (Management and Administration) Rules, 2014 and SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015 (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof, for the time being in force) and in terms of General Circular No.14/2020 dated April 08, 2020, General Circular No.17/2020 dated April 13, 2020 and General Circular No. 22/2020 dated June 15, 2020 issued by Ministry of Corporate Affairs (the 'MCA Circulars'), Perfect Infraengineers Limited ("the Company") has completed the dispatch of Postal Ballot Notice ("the Notice") on 08th August, 2020 through e-mail to all its Members who have registered their email ID with the Depositories through the concerned Depository Participants and the Company's Registrar and Transfer Agent, KFIN Technologies Pvt. Ltd. ("KFintech") for seeking their approval by way of Special Resolution in respect of the business mentioned in the Notice dated 7th August, 2020.

Each Members' voting rights shall be in proportion to his/her shares of the Paid-up share capital of the Company as on cut-off date i.e Friday 24th July, 2020 which will only be consider for voting. A person for who is not a member as on the cut-off date should treat his Notice for information purpose only.

The Company has engaged the services of KFintech for providing 'Remote E-Voting' facility to its Members. The Remote E-Voting facility will commence on from **Sunday, 09th August, 2020** at 09:00 a.m. India Standard Time ('IST') till **Monday, 07th September, 2020** at 05:00 p.m. (IST) both days inclusive. Remote e-voting module will be disabled for voting by KFintech on **Monday, 07th September, 2020** at 05:00.

The Board of Directors has appointed Mrs. Prajakta V. Padhye (FCS. NO. 7478) partner of Nilesh A. Pradhan & Co., LLP, Practicing Company Secretaries as Scrutinizer for scrutinizing the E-voting process and conducting Postal Ballot process in a fair and transparent manner. In case of any failure/ inability to scrutinize 'Remote E-Voting' by Mrs. Prajakta V. Padhye, Mr. Nilesh A. Pradhan Practicing Company Secretary shall be alternate Scrutinizer to her.

The members of the Company are also hereby informed and requested to note that:

1. The necessary instructions for Remote E-Voting has been set out in the Notice dated 07th August, 2020.
2. Once vote on a resolution is cast by the member, he/she shall not be allowed to change it subsequently or cast the vote again.
3. The voting rights of the Members shall be in proportion to their shares of the paid-up equity share capital of the Company as on the Cut-off date.
4. The Postal Ballot Notice, together with Explanatory statement, Remote E-Voting instructions and the process of e-mail registration for non-registered Members to avail Postal Ballot Notice & procedure for 'Remote E-Voting', in terms of MCA Circulars, is available on the Company's website www.perfectinfra.com. The Postal Ballot Notice along with its Explanatory Statement is also available on KFintech's e-voting (i) website https://evoting.karvy.com and at the relevant sections of the websites of the National Stock Exchanges on which the shares of the Company are listed.
5. In light of the MCA Circulars, Members who have not registered their e-mail address and in consequence could not receive the e-voting notice may temporarily get their e-mail registered with the KFintech by clicking the link: https://karisma.kfintech.com/emailreg and following the registration process as guided thereafter. Post successful registration of the e-mail, the Member of the Company would get soft copy of the notice and the procedure for e-voting along with the User ID and Password to enable e-voting for this Postal Ballot. In case of any queries, Member may write to einward.ris@kfintech.com.
